## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १२/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१८/२०१२/जा.१३८ दिनांक १४/०३/२०१२, २८/०३/२०१२ व ०९/०४/२०१.

३) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१८/२०१२/जा.१३९ दि.१४/०३/२०१२.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांचे दिनांक १७/०४/२०१२ रोजीचे अभिवेदन.

५) ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे दिनांक १८/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

६) जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांचे पत्र क्र./पुरवठा/का.१/टे.१/जप्तमुद्देमाल/वशी-१२२४/१२-अन्वये दिनांक २०/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१८/२०१२/जा.2९3
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :-०८/०५/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०९/०३/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह शहाड-कल्याण रस्त्यावरील फ्लाय ओव्हर ब्रिज जवळील हॉटेल सपना येथून पायी चालत दोन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या नवरंग मंदिरासमोरच्या नवरंग को.ऑप.हाऊसिंग सोसायटी, डी-१, गाळा क्रमांक ६, शहाड (प) या इमारतीच्या समोर येऊन पोहचले. सदर ठिकाणी इमारतीच्या समोर ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ हा उभा होता. त्यामधून चार हमाल एकमेकांच्या मदतीने गाडीमधून वरील गाळ्यामध्ये धान्यांची पोती उतरवित असल्याचे पथकास दिसून आले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष हमालांकडे चौकशी केली असतां, गाडीमधील हमालाने तो तांदूळ असल्याचे सांगितले. सदरच्या गोण्यांची पाहणी व त्यावरील नोंदविलेल्या शिक्क्या व मजकुराबाबत चौकशी करताच, गाडीमधील दोन व खाली उभा असलेला एक असे एकूण तीन हमाल कोणताही सुगावा न लागता पळून गेले. राहिलेल्या चौथ्या हमालाला अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष ताब्यांत घेतले.



0001

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष गाडीतील आणि गोदामातील तांदळाची पोती तपासून पाहिली असता, त्यावर भारतीय खाद्य निगमचा शिक्का असल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले. अधिकाऱ्यांनी बाचक्यांमध्ये बाबू (गोणीतील धान्य तपासण्याचे अवजार) मारुन बाचक्यांमध्ये तांदूळ असल्याची खातरजमा केली.

तदनंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ताब्यात घेतलेल्या चौथ्या हमालाला त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव शंकर विलास कसबे असे सांगून तो राजू या मुकादमासाठी गेल्या ८ दिवसांपासून काम करत असल्याचे सांगितले. तदनंतर अधिकाऱ्यांनी शंकर विलास कसबे याचेकडे गाडीच्या चालकाबाबत चौकशी केली असता, त्याने त्याला ठावूक नसल्याचे सांगितले. त्याच वेळीस एक इसम घटनास्थळी उपस्थित झाला व तो त्याने तो ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चा चालक असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर इसमास ताब्यात घेऊन त्याचे नांव विचारले असता, बंसी आत्ताम वाघमारे असे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष बंसी वाघमारे याचेकडे गाडी क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधील तांदळाबाबत आणि गाडीच्या मालकाबाबत चौकशी केली असता, त्याने त्याबाबतची संबंधित कागदपत्रे गाडीच्या केबिनमध्ये असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदरची कागदपत्रे तात्काळ सादर करण्याचे आदेश दिल्यानंतर बंसी वाघमारे याने ट्रकच्या केबिनमधून कागदपत्रे काढून पंचासमक्ष अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर कागदपत्रांची पडताळणी केली असता, त्यामध्ये अंजूर फाटा-दापोडा, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील एफ.सी.आय. च्या गोदामातील मे. धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट यांनी मुरबाड येथे वितरण करण्यासाठी उचल केलेला २८० बाचकी बीपीएल तांदळाचा अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे मुख्यालय, जव्हार यांची सही व शिक्क्यानिशी असलेला ट्रान्सपोर्ट पास क्र. ०७२६६९६ ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ करिताचा दि. ०९/०३/२०१२ रोजीचा अधिकाऱ्यांना आढळून आला. सदर ट्रान्सपोर्ट पासाबाबत अधिकाऱ्यांनी बंसी वाघमारे याचेकडे विचारणा केली असता, सदर पासानुसार ट्रकमधील तांदूळ ट्रकचे मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे समक्ष भरल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. तदनंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष इतर कागदपत्रांची पडताळणी केली असता ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे परमिट सुदाम रामभाऊ सानप यांचे नावे असल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदरचा ट्रान्सपोर्ट पास आणि गाडीच्या कागदपत्रांची फाईल जप्त करुन ताब्यात घेतली.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष डी-१, नवरंग को.ऑप.हाऊसिंग सोसायटीच्या गाळा क्रमांक ६ ज्यामध्ये ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून तांदळाची बाचकी उतरविली जात होती त्याची पाहणी सुरु केली. सदर गाळा सुमारे ५४ फुट X १० फुट या आकाराचा असल्याचे पंचासमक्ष आढळून आले. अधिकाऱ्यांनी सदर गाळ्यामध्ये पंचासमक्ष प्रवेश केल्यावर ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून उतरविलेल्या तांदळाच्या ४७ बाचकी आणि त्या व्यतिरिक्त गाळ्यामध्ये अगोदरचीच शासकीय तांदळाची परंतू पलटी मारलेली ९५ बाचकी तसेच गव्हाचे एक बाचके

असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष आढळून आले. तसेच सदर गाळ्यामध्ये १ वजन काटा, गोणी शिलाईचे यंत्र, गोणी शिलाई धाग्याचे बंडल, पांढऱ्या रंगाची प्लॅस्टिकची रिकामी बाचकी ठेवलेली असल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष आढळले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ट्रक चालक बंसी वाघमारे याच्याकडे गाळा मालकाबाबत आणि गाळ्यातील मालाबाबत चौकशी व विचारणा केली असता त्याने त्याबद्दल त्याला काहीही माहिती नसून ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप याने सदरचा तांदळाने भरलेला ट्रक भिवंडी गोदामातून शहाड फ्लाय ओव्हर ब्रिजच्या खाली घेऊन येण्याचे सांगितल्याचे अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले.

अशाप्रकारे ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे चालक बंसी आत्तम वाघमारे याने भिवंडी शासकीय गोदामातून ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप याचे सांगण्यावरुन ट्रान्सपोर्ट पास क्रमांक ०७२६६९६ दिनांक ०९/०२/२०१२ नुसार मे. धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट यांच्यासाठी भरुन घेतलेला २८० बाचकी बीपीएल तांदळाचा साठा हा मुरबाड येथील गोदामामध्ये उतरविण्यासाठी न नेता ती मध्येच मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील डी-१, नवरंग को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, गाळा क्र. ६, शहाड (प), शहाड फ्लाय ओव्हर ब्रिजजवळ कल्याण येथे उतरविण्यासाठी बेकायदेशिरपणे आणल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सदरचा ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ आणि सदरच्या ट्रकमधील तांदळाचा साठा आणि गोदामातील शासकीय तांदूळ व गव्हाचा साठा घटनास्थळी अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त मुद्देमालाची मोजदाद केली असता, ती खालील प्रमाणे आढळली,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ | १ नग | ८,००,०००/- |
| २ | उक्त ट्रममध्ये आढळून आलेल्या शासकीय तांदूळाची सरासरी ५० किलो भरतीची २३३ नग बाचकी | ११६५० कि.ग्रॅ. | २,३३,०००/- |
| ३ | शासकीय माल पलटी केल्यानंतर पुर्नशिलाईसाठी वापरावयाचे गोणी शिलाई मशिन | १ नग | ५,०००/- |
| ४ | ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून डी-१, नवरंग सोसायटीच्या गाळा क्र. ६ मध्ये उतरविलेल्या शासकीय तांदळाच्या सरासरी ५० किलो भरतीची ४७ नग बाचकी | २३५० कि.ग्रॅ. | ४७,०००/- |
| ५ | गोदामातील पलटी मारलेल्या शासकीय तांदळाची सरासरी ५० किलो भरतीची ९५ नग बाचकी | ४७५० कि.ग्रॅ. | ९५,०००/- |
| ६ | गोदामातील पलटी मारलेल्या शासकीय गव्हाचे १ बाचके | ५० कि.ग्रॅ. | ९००/- |
| ७ | वजन काटा | १ नग | ३,५००/- |
| ८ | रिकामी पांढऱ्या रंगाची प्लॅस्टिकची बाचकी | ६०० नग | ६,०००/- |
| ९ | गोणी शिलाई धाग्यांचे बंडल | २ नग | १४०/- |
| | | एकूण | ११,९०,५४०/- |

दरम्यानच्या काळात महात्मा फुले पोलिस ठाण्यात अधिकाऱ्यांनी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानुसार त्यांचे पोलिस हवालदार श्री. बी.डी. गजरे, बक्कल क्र. ११३५ हे घटनास्थळी हजर झाले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष त्यांना जप्त मुद्देमाल व आरोपी दाखवून घटनेची हकिकत कथन केली.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पोलिसासमक्ष व पंचासमक्ष जप्त मुद्देमालाच्या यादीतील अनुक्रमांक ३ ते ९ गोदामामध्ये ठेवून सदरचे गोदाम सिलबंद करुन पोलिसांच्या ताब्यात देऊन उर्वरित जप्त मुद्देमाला पैकी यादीतील अनुक्रमांक १ व २ नुसार ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ आणि त्यातील २३३ बाचकी शासकीय तांदळासह ट्रक पंचासमक्ष पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. तेथून सदर ट्रक पोलिसांनी पंच व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आधारवाडी शासकीय गोदामात नेऊन उभा केला.

अशाप्रकारे उपरोक्त संबंधितांनी आपआपसात संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा तांदूळ नियोजित मुरबाड येथील शासकीय गोदाम येथे न नेता तो घटनास्थळी गाळा क्र. ६, डी-१, नवरंग सोसायटी, शहाड (प) येथे अवैधरित्या स्वत:च्या फायद्यासाठी उतरविताना आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधिताविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ (२) दि बॉम्बे रेशनिंग एरिया शेडयुल कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रिब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६, ७ व ८ तसेच (३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) ऑर्डर १९६६ चे कलम १८ (३) (एएए) चा भंग केल्यावरुन संबंधिताविरुध्द महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. II ३१/२०१२ दि. १०/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन उपरोक्त मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी नमूद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या एकूण साठ्यापैकी २८० बाचकी तांदळाचा साठा हा मुरबाड तहसिलदार यांच्या कार्यक्षेत्रातील रास्तभाव दुकानांना वितरीत करावयाचा बी.पी.एल. तांदूळ असल्याचा ट्रान्सपोर्ट पासवरुन प्रथमदर्शनी दिसून आल्याने सदरच्या जप्त मुद्देमालाबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ३ अन्वये अप्पर जिल्हाधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांचा स्वंयस्पष्ट अभिप्रायासह अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २७/०३/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

005

दिनांक २७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०३/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलीस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १७/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस श्री. एच.एन. जाधव तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांनी उपस्थित राहून वाचावे क्रं. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीसही आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

प्रस्तूत गुन्ह्यामधील जप्त मुद्देमालाबाबत जिल्हापुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांनी वाचावे क्र. ६ अन्वये अहवाल सादर केला.

प्रस्तूत प्रकरणी आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब, सदरचे प्रकरण एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक १७/०४/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित श्री. एच.एन. जाधव तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल हा नाशवंत आहे. जप्त केलेला माल हा ट्रक भरुन आहे. प्रस्तूत प्रकरणी प्राप्त झालेल्या कारणे दाखवा नोटीसाच्या प्रती संबंधीतांना बजावणी करण्यात आली आहे. तरी सदर ट्रकमधील जप्त मुद्देमाल तांदळाची तात्काळ निर्गती होणेस विनंती असल्याचे नमूद आहे.

ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे दिनांक १८/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदनात, दिनांक १०/०३/२०१२ रोजी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मध्ये २८० कट्टे तांदूळ भारतीय खाद्य निगम भिवंडी आगारातून मुरबाड तहसिलदार गोदामसाठी भरले होते. परंतू जास्त वजन भरल्याकारणाने शहाड ब्रिजवर गाडी चढत नसल्याने गाडीमधला थोडा लोड कमी करण्यासाठी त्याने शहाड येथील दुकानाच्या गाळ्यात ४० कट्टे उतरविण्यासाठी गाडी उभी केली होती व त्यातील काही कट्टे उतरविले होते व तो माल नंतर दुसऱ्या छोट्या गाडीने मुरबाड तहसिलदाराच्या गोडावूनला घेऊन जाणार होता. त्याचा तांदूळ बाहेर विकण्याचा काहीच उद्देश नव्हता. कारण तांदूळ सरकारी गोदाम तहसिलदार मुरबाड यांचा होता. तांदूळ उतरविताना आपल्या कार्यालयाचे फिरते पथक शाखेच्या अधिकाऱ्यांनी धाड टाकून त्याने सरकारी माल बाहेर खाली केला

म्हणून महात्मा फुले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्याच्याकडे त्याच्या कुटूंबियाचा उदरनिर्वाह करण्यासाठी सदरील ट्रकशिवाय कोणताही पर्याय नाही. म्हणून त्याचा ट्रक सोडण्याचे आदेश द्यावे. त्यासाठी सत्य प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे की, सदर ट्रक केसचा निकाल लागेपर्यंत विकणार नाही. ट्रकच्या भाड्यावर त्याच्या कुटूंबियाचा उदरनिर्वाह होईल, अशी विनंती करुन तसे नमूद केले आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांचे दिनांक २०/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, सदरचा जप्त करण्यात आलेला धान्य ट्रक हा त्यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी परिचलन निरिक्षक, भिवंडी यांनी भारतीय खाद्य निगम भिवंडी यांचे शासकीय गोदामातून त्यांच्याकडील टी.पी. पास क्र. ७२६६९६ अन्वये मुरबाड तालुक्याकरिता शासकीय वाहतूक ठेकेदार धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट डहाणू रोड यांनी उपलब्ध करुन दिलेला धान्य ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ या धान्य ट्रकने बी.पी.एल. तांदूळ १३७ क्विंटल २८ किलो व ८०० ग्रॅम इतका भरुन घेऊन दिनांक ०९/०३/२०१२ रोजी रवाना केला होता. परंतू तो धान्य ट्रक मुरबाड येथील शासकीय गोदामात प्राप्त न होता, शहाड-कल्याण रस्त्यावरील फ्लायओव्हर ब्रिज जवळील हॉटेल सपना जवळ नवरंग मंदिरासमोरच्या नवरंग को.ऑप. हाऊसिंग सोसायटी, डी-१, गाळा क्र. ६, शहाड (पश्चिम) येथे अनधिकृतपणे खाली होत असतांना शिधावाटप अधिकारी ३८-फ कल्याण यांनी जप्त केला आहे. परिचलन निरिक्षक भिवंडी यांनी एकूण ६ धान्य ट्रक दिनांक ०९/०३/२०१२ रोजी मुरबाड तालुक्याकरिता भरुन पाठविले होते. सदर धान्य ट्रक प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत त्यांनी दिनांक १७/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली असता, एकूण ६ धान्य ट्रकपैकी ५ धान्यट्रक प्राप्त झाले असून ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ हा धान्य ट्रक शासकीय गोदाम मुरबाड येथे प्राप्त न झाल्याबाबत त्यांनी दिनांक १९/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर धान्य ट्रकमधील जप्त केलेला तांदूळ हा मुरबाड तालूक्यातील शासकीय गोदामाकरिता भरलेला होता. तो जप्त करण्यात आल्यामुळे शिधापत्रिकाधारक वंचित राहिले आहेत. तरी सदरचा तांदूळ त्यांच्या कार्यालयाकडे सूपूर्द केल्यास ज्या तहसिल मुरबाडकरिता सदरचा साठा उचल केला होता. त्यांच्याकडे लाभार्थ्यांना वाटप करण्याकरिता देता येईल व सदर धान्याची किंमत क्रिमिनल डिपॉझिट सदरी आपल्याकडे जमा करता येईल. तरी सदरचा जप्त केलेला तांदूळ त्यांच्या कार्यालयास सुर्पूद करण्याची विनंती केलेली आहे.

...ROLLER OF RATIONING ... HEAD OFFICE ... MUMBAI

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ०९/०३/२०१२ रोजी या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील अधिकारी यांनी पंचासह शहाड-कल्याण रस्त्यावरील फ्लाय ओव्हर ब्रिज जवळील नवरंग मंदिरासमोरच्या नवरंग को.ऑप.हाऊसिंग

सोसायटी, डी-१, गाळा क्रमांक ६, शहाड (प) या ठिकाणी धाड टाकली असता, ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून चार हमाल एकमेकांच्या मदतीने गाडीमधून वरील गाळ्यामध्ये धान्यांची पोती उतरवित असल्याचे पथकास दिसून आले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष हमालांकडे चौकशी केली असता, गाडीमधील हमालाने तो तांदूळ असल्याचे सांगितले. सदरच्या गोण्यांची पाहणी व त्यावरील नोंदविलेल्या शिक्क्या व मजकुराबाबत चौकशी करताच, गाडीमधील दोन व खाली उभा असलेला एक असे एकूण तीन हमाल कोणताही सुगावा न लागता पळून गेले. राहिलेल्या चौथ्या हमालाला अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष ताब्यात घेतले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गाडीतील आणि गोदामातील तांदळाची पोती तपासून पाहिली असता, त्यावर भारतील खाद्य निगमचा शिक्का असल्याचे अधिकाऱ्यांना आढळून आले. अधिकाऱ्यांनी बाचक्यांमध्ये बांबू (गोणीतील धान्य तपासण्याचे अवजार) मारुन बाचक्यांमध्ये तांदूळ असल्याची खातरजमा केली. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष ताब्यात घेतलेल्या चौथा इसम नामे शंकर विलास कसबे हा राजू या मुकादमासाठी गेल्या ८ दिवसांपासून काम करत असल्याचे सांगितले. त्याच वेळीस एक इसम नामे बंसी आत्ताम वाघमारे घटनास्थळी उपस्थित झाला व तो त्याने तो ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चा चालक असल्याचे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष बंसी वाघमारे याचेकडे गाडी क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधील तांदळाबाबत आणि गाडीच्या मालकाबाबत चौकशी केली असता, त्याने ट्रकच्या केबिनमधून कागदपत्रे काढून पंचांसमक्ष अधिकाऱ्यांकडे सुर्पूद केली असता, त्यामध्ये अंजूर फाटा-दापोडा, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे येथील एफ.सी.आय. च्या गोदामातील मे. धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट यांनी मुरबाड येथे वितरण करण्यासाठी उचल केलेला २८० बाचकी बीपीएल तांदळाचा अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे मुंख्यालय, जव्हार यांची सही व शिक्क्यानिशी असलेला ट्रान्सपोर्ट पास क्र. ०७२६६९६ ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ करिताचा दि. ०९/०३/२०१२ रोजीचा अधिकाऱ्यांना आढळून आला. सदर ट्रान्सपोर्ट पासाबाबत अधिकाऱ्यांनी बंसी वाघमारे याचेकडे विचारणा केली असता, सदर पासानुसार ट्रकमधील तांदूळ ट्रकचे मालक सुदाम रामभाऊ सानप यांचे समक्ष भरल्याचे अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष डी-१, नवरंग को.ऑप.हाऊसिंग सोसायटीच्या गाळा क्रमांक ६ ज्यामध्ये ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून तांदळाची बाचकी उतरविली जात होती त्याची पाहणी केली असता, सदर गाळ्यामध्ये पंचांसमक्ष प्रवेश केल्यावर ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून उतरविलेल्या तांदळाच्या ४७ बाचकी आणि त्या व्यतिरिक्त गाळ्यांमध्ये अगोदरचीच शासकीय तांदळाची परंतू पलटी मारलेली ९५ बाचकी तसेच गव्हाचे एक बाचके व १ वजन काटा, गोणी शिलाईचे यंत्र, गोणी शिलाई धाग्याचे बंडल, पांढऱ्या रंगाची प्लॅस्टिकची रिकामी बाचकी ठेवलेली असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष आढळून आले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष ट्रक चालक बंसी वाघमारे याच्याकडे गाळा मालकाबाबत आणि गाळ्यातील मालाबाबत चौकशी व विचारणा केली असता, त्याने त्याबद्दल त्याला काहीही माहिती नसून ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप याने सदरचा तांदळाने भरलेला ट्रक भिवंडी गोदामातून शहाड फ्लाय ओव्हर ब्रिजच्या खाली घेऊन येण्याचे

सांगितल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. अशाप्रकारे ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे चालक बंसी आत्तम वाघमारे याने भिवंडी शासकीय गोदामातून ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप याचे सांगण्यावरुन ट्रान्सपोर्ट पास क्रमांक ०७२६६९६ दिनांक ०९/०२/२०१२ नुसार मे. धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट यांच्यासाठी भरुन घेतलेला २८० बाचकी बीपीएल तांदळाचा साठा हा मुरबाड येथील गोदामामध्ये उतरविण्यासाठी न नेता ती मध्येच मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील डी-१, नवरंग को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, गाळा क्र. ६, शहाड (प), शहाड फ्लाय ओव्हर ब्रिजजवळ कल्याण येथे उतरविण्यासाठी बेकायदेशिरपणे आणल्याचे स्पष्ट झाल्यामुळे सदरचा ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ आणि सदरच्या ट्रकमधील तांदळाचा साठा आणि गोदामातील शासकीय तांदूळ व गव्हाचा साठा घटनास्थळी अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

प्रस्तूत प्रकरणी, जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांनी सादर केलेल्या अहवालात, सदरचा जप्त करण्यात आलेला धान्य ट्रक हा त्यांच्या कार्यालयाचे प्रतिनिधी परिचलन निरिक्षक, भिवंडी यांनी भारतीय खाद्य निगम भिवंडी यांचे शासकीय गोदामातून त्यांच्याकडील टी.पी. पास क्र. ७२६६९६ अन्वये मुरबाड तालुक्याकरिता शासकीय वाहतूक ठेकेदार धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट डहाणू रोड यांनी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून बी.पी.एल. तांदूळ १३७ क्विंटल २८ किलो व ८०० ग्रॅम इतका भरुन घेऊन दिनांक ०९/०३/२०१२ रोजी रवाना केला होता. परंतू तो धान्य ट्रक मुरबाड येथील शासकीय गोदामात प्राप्त न होता, शहाड-कल्याण रस्त्यावरील फ्लायओव्हर ब्रिज जवळील हॉटेल सपना जवळ नवरंग मंदिरासमोरच्या नवरंग को.ऑप. हाऊसिंग सोसायटी, डी-१, गाळा क्र. ६, शहाड (पश्चिम) येथे अनधिकृतपणे खाली होत असतांना शिधावाटप अधिकारी ३८-फ कल्याण यांनी जप्त केला आहे. परिचलन निरिक्षक भिवंडी यांनी एकूण ६ धान्य ट्रक दिनांक ०९/०३/२०१२ रोजी मुरबाड तालुक्याकरिता भरुन पाठविले होते. एकूण ६ धान्य ट्रकपैकी ५ धान्यट्रक प्राप्त झाले असून ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ हा धान्य ट्रक शासकीय गोदाम मुरबाड येथे प्राप्त न झाल्याबाबत अहवालात नमूद आहे. सदर धान्य ट्रकमधील जप्त केलेला तांदूळ हा मुरबाड तालूक्यातील शासकीय गोदामाकरिता भरलेला होता. तो जप्त करण्यात आल्यामुळे शिधापत्रिकाधारक वंचित राहिले आहेत. तरी सदरचा तांदूळ त्यांच्या कार्यालयाकडे सूपूर्द केल्यास ज्या तहसिल मुरबाडकरिता सदरचा साठा उचल केला होता. त्यांच्याकडे लाभार्थ्यांना वाटप करण्याकरिता देता येईल व सदर धान्याची किंमत क्रिमिनल डिपॉझिट सदरी आपल्याकडे जमा करता येईल. तरी सदरचा जप्त केलेला तांदूळ त्यांच्या कार्यालयास सुर्पूद करण्याची विनंती केलेली आहे.

उपरोक्त गुन्ह्यात घटनास्थळी जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मध्ये भिवंडी येथील शासकीय गोदामातून मे. धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट यांनी मुरबाड येथे शासकीय गोदामात वितरण करण्यासाठी ट्रान्सपोर्ट पास क्र. ०७२६६९६ दिनांक ०९/०३/२०१२ अन्वये २८० बाचके बी.पी.एल. तांदळाचा साठा हा अप्पर जिल्हाधिकारी, ठाणे मुख्यालय जव्हार यांच्या आदेशान्वये भरण्यात आला होता. सदरच्या शासन नियंत्रित दराच्या

एकूण २८० बाचकी तांदळाच्या साठ्यापैकी आरोपीतानी संगणमत करुन घटनास्थळी असलेल्या अनधिकृत गोदामात ४७ बाचके उतरविले असताना पथकाने रंगेहाथ पकडले आहे. याव्यतिरिक्त सदर गोदामात अगोदरचीच शासकीय तांदळाची परतू पलटी मारलेली ९५ बाचकी तसेच गव्हाचा १ बाचका पथकाने घटनास्थळी जप्त केला आहे. सबब, नमूद गुन्ह्यातील आरोपीतांनी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा शासन अनुदानित दराचा तांदूळ नियोजित मुरबाड येथील शासकीय गोदामात न नेता तसेच गोदामातील उर्वरित तांदूळ व गव्हाचा साठाही अवैध मार्गाने स्वत:च्या फायद्यासाठी काळाबाजारीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, नमूद गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधील २३३ बाचकी व सदर ट्रकमधील गोदामात उतरविण्यात आलेला ४७ बाचकी तांदळाचा साठा तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळी गोदामात जप्त करण्यात आलेला ९५ बाचकी तांदूळ व १ बाचका गव्हाचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त शासनजमा करण्यात आलेल्या एकूण ३७५ बाचक्यांमधील तांदूळ व १ बाचक्यामधील गव्हाच्या साठ्यापैकी, जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांनी केलेल्या विनंतीनुसार शिधापत्रिकाधारक वंचित राहू नये म्हणून २८० बाचकी तांदळाचा साठा हा पोलिसांनी, जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांच्या मदतीने त्यांच्या अधिपत्याखालील तहसिल मुरबाड कार्यक्षेत्रातील रास्तभाव दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी व उर्वरीत ९५ बाचकी तांदूळ व १ बाचका गव्हाचा साठा हा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मदतीने त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी जप्त ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे मालक व इतर आरोपी/अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन आरोपी/अपचारी यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते.

तथापी, सुदाम रामभाऊ सानप यांनी ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे मालक म्हणून टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, दिनांक १०/०३/२०१२ रोजी मुरबाड तहसिलदार गोदामासाठी त्यांच्या ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधून भरण्यात आलेल्या २८० कट्टे तांदूळ भारतीय खाद्य निगम भिवंडी आगारातून भरल्याचे सांगून जास्त वजन भरल्याकारणाने शहाड ब्रिजवर गाडी चढत नसल्याने गाडीमधला थोडा लोड कमी करण्यासाठी त्याने शहाड येथील दुकानाच्या गाळ्यात ४० कट्टे उतरविण्यासाठी गाडी उभी केली होती व त्यातील काही कट्टे उतरवित असताना पथकाने धाड टाकून पकडल्याचे सांगितले. परंतू त्याने ट्रकच्या मालकीबाबतचे परिवहन विभागाचे कोणतेही

पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली नाहीत. ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे चालक बसी आत्तम वाघमारे यांनी घटनास्थळी पंचासमक्ष दिलेल्या जबाबात, त्यांना ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप याने सदरचा तांदळाने भरलेला ट्रक भिवंडी गोदामातून शहाड फ्लाय ओव्हर ब्रिजच्या खाली घेऊन येण्याचे सांगितल्याचे नमूद आहे. यावरुन ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे आहे. तसेच यापूर्वीसुध्दा सुदाम रामभाऊ सानप यांच्या मालकीचा अलाहिदा ट्रक क्र. एमएच-०४-सीपी-६४१३ हा ट्रक शिवाजीनगर पोलिस ठाणे, अंबरनाथ येथील गुन्हा नोंद क्र. ॥ २१/२०११ दिनांक १८/०८/२०११ रोजी उक्त ट्रक व ट्रकमधील २४० बाचके गहू जप्त करण्यात आला होता व सदर प्रकरणी जप्त करण्यात आलेला गहू व ट्रक हे शासनजमा करण्याचे आदेश या कार्यालयामार्फत पारीत करण्यात आले आहेत. म्हणजेच ट्रक मालक सुदाम रामभाऊ सानप हे सराईत गुन्हेगार असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला ट्रकमधील तांदळाचा साठा हा सुदाम रामभाऊ सानप याच्या सांगण्यावरुन घटनास्थळी असलेल्या अनधिकृत गोदामावर उतरवित असल्याचे रंगेहाथ पकडले आहे. यावरुन, ट्रक मालक यांचा नमूद गुन्ह्यात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होत असून आरोपी यांनी सदर ट्रकचा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रकचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, ट्रकच्या मालकीबाबत कोणताही कायदेशीर पुरावा सादर न केल्याने अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण येथे गुन्हा नोंद क्र. ॥ ३१/२०१२ दि.१०/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंदमध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

CONTROLLER OF RATIONING & D... HEAD OFF... ...BAI

आदेश :-

१) प्रस्तूत गुन्हा नोंद प्रकरणी, जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधील २३३ बाचकी व सदर ट्रकमधून गोदामात उतरविण्यात आलेला ४७ बाचकी तांदळाचा असा एकूण २८० बाचक्यांमधील

साठा तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळी गोदामात जप्त करण्यात आलेला ९५ बाचकी तांदूळ व १ बाचका गव्हाचा साठा शासनजमा करण्यात यावा. 0011

२) शासनजमा करण्यात आलेल्या ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ मधील २३३ बाचकी व सदर ट्रकमधून गोदामात उतरविण्यात आलेला ४७ बाचकी असा एकूण २८० बाचक्यांमधील तांदळाचा साठा पोलिसांनी, जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांच्या मदतीने त्यांच्या अधिपत्याखालील तहसिल मुरबाड कार्यक्षेत्रातील रास्तभाव दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) तसेच या व्यतिरिक्त घटनास्थळी गोदामात जप्त करण्यात आलेला ९५ बाचकी तांदूळ व १ बाचका गव्हाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मदतीने त्यांचे कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त गव्हाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या पुढील महिन्याच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

५) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा ट्रकचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

६) जप्त करण्यात आलेले पुर्नशिलाईसाठी वापरावयाचे १ गोणी शिलाई मशिन, १ वजन काटा, रिकामी पांढ्या रंगाची प्लॅस्टिकच्या ६०० बाचकी, गोणी शिलाई धाग्यांचे २ बंडल इ. पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) याचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) शंकर विलास कसबे, हमाल
२) ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चा चालक, बंसी आत्तम वाघमारे
३) ट्रक क्र. एमएच-४३-ई-६६४५ चे मालक, सुदाम रामभाऊ सानप
४) घटनास्थळी फरार झालेले तीन हमाल
५) धनलक्ष्मी ट्रान्सपोर्टचे मालक
६) राजू (मुकादम)

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, महात्मा फुले चौक पोलिस ठाणे, कल्याण यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसाचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होवून तांदूळ व गव्हाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील, याची नोंद घ्यावी.
३) जिल्हा पुरवठा अधिकारी ठाणे, मुख्यालय जव्हार यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित. त्यांना कळविण्यात येते की, आदेशात नमुद केल्याप्रमाणे सात दिवसाचे आत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा. सदरच्या कार्यवाहीस विलंब होवून तांदळाचा साठा खराब झाल्यास त्याची जबाबदारी आपल्यावर राहील, याची नोंद घ्यावी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता अग्रेषित.
६) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता अग्रेषित.
७) निंवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE - 276 - MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.